Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - “ Pedagogy And Teaching Learning ”

# अध्ययन अध्यापनातील नव प्रवाह

प्रा.एस.एन. महाले, सहा.प्राध्यापिका,
प्रा.डॉ.एच.डी.चित्ते, प्राध्यापक,
ॲड.विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, (एम.एड.विभाग) नाशिक.

**प्रास्ताविक -**

शिक्षण हा आता मूलभूत अधिकार मानला जातो, या मूलभूत अधिकाराचे मूर्त रुप म्हणजे औपचारिक पद्धतीने घेतलेले शिक्षण होय.

पेस्टॉलॉजी या विचारवंताच्यामते, ' शिक्षण म्हणजे मानवाच्या आंतरिक शक्तीचा नैसर्गिक, सुसंगत व क्रमबद्ध विकास होय. परिस्थितीशी समायोजन साधून स्वतःच्या प्रवृत्तींचे व गरजांचे समाधान करण्यासाठी जरुर ती पात्रता कौशल्य अंगी आणणे आवश्यक असते व ते प्राप्त होण्यासाठी व्यक्ती स्वतःमध्ये जे परिवर्तन व सुधारणा करते त्यालाच अध्ययन म्हणतात. अध्ययनार्थींमध्ये अशी पात्रता निर्माण व्हायची असेल तर प्रक्रिया प्रभावी व मार्मिक असली पाहिजे. अध्यापनाचा मुख्य उद्देश पूर्वनियोजित उद्दिष्टानुरुप अध्ययनार्थींच्या वर्तनातील परिवर्तन होय. अध्ययनार्थीमध्ये 'असे' परिवर्तन 'कसे' घडवून आणावयाचे ? या प्रश्नाचे उत्तर 'अध्यापन-पद्धतीने' हे असले तरी ते पुरेसे मात्र नाही वरील प्रश्नाच्या उकलीसाठी सातत्याने संशोधनात्मक प्रयत्न होत आहेत. प्रचलित अध्यापन पद्धतींमध्ये नव प्रवाहांची भर पडत आहे.

शिक्षण व्यवस्थेसमोर विदयार्थी संख्येत झालेली वाढ, बदललेली राजकिय, सामाजिक परिस्थिती, शिक्षणाचे माध्यम ' माध्यमाचा ' शिक्षणवरील प्रभाव असे अनेक आवाहने आहेत. त्यापैकी विदयार्थ्यांमध्ये आशयाचे आकलन, उपयोजन, कौशल्यनिर्मिती, अभिवृत्ती इ. या उद्दिष्टांची किमान ते कमाल पातळीपर्यंत पूर्तता हे होय. हे आवाहन पेलण्यासाठी अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये नव प्रवाहांचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. या नवप्रवाहांचा अंगीकार करतांना शिक्षकाची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

**नव प्रवाहांची गरज व महत्त्व -**


अध्ययन ही नैसर्गिक प्रक्रिया आहे; स्वयंप्रवृत्त क्रिया आहे. प्रत्येकजण आपणहून शिकत असतो. केवळ स्वानुभावातून शिक्षण यावर विसंबून राहिल्यास व्यक्तिविकास पूर्णपणे साधता येणार नाही; त्यासाठी अध्यापन आवश्यक ते मार्गदर्शन करुन तिच्यात सहजता, सुकरता व गतिमानता आणणे हे अध्यापनाचे कार्य आहे. प्रचलित पद्धतीने अध्यापनाबाबत पुनर्विचार करणे आवश्यक वाटते; कारण ते अपुरे आहे व त्यामध्ये अनेक दोष संभवतात.

वर्गाध्यापनामध्ये सर्व विदयार्थ्यांना एकदम शिकवावे लागत असल्याने व्यक्तिगत भिन्नता लक्षात घ्यायला फारसा वाव नसतो. प्रत्येक विदयार्थ्यांची आकलनशक्ती बुध्दिमत्ता, शिकण्याची पात्रता सारखी नसल्यामुळे प्रत्येकाच्या शिकण्याच्या गतीत फरक पडतो. वर्गाध्यापनात शिक्षक बहुदा केंद्रस्थनी असतो त्यामुळे स्वयं अध्ययनाला पूर्णतः वाव मिळत नाही. वर्गातील शिक्षक व विदयार्थी यांचे नाते पूर्णतः खेळमेळीचे व सहकार्याचे राहू शकत नाही. तसेच वर्गातील एकंदर वातावरण हे देखील पूर्णतः अनैपचारिक व खेळीमेळीचे टिकू शकत नाही. याबरोबर वेळापत्रकाच्या चौकटीचे बंधन पाळावे लागते. अध्ययन अध्यापनातील साचेबंदपणा, कृत्रिमता, यांत्रिकता, अपुरेपणा घालविण्यासाठी अध्यापनशास्त्रातील नवप्रवाहांची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**अध्ययन - अध्यापनातील नव प्रवाहांचे महत्त्व -**

अध्यापनातून विदयार्थ्यांना केवळ माहिती किंवा ज्ञान देणे हा शिक्षणाचा मूळ उद्देश नसून विदयार्थ्यांच्या मनःशक्तींचा व प्रवृतींचा विकास करणे हा होय. या नवप्रवाहांच्या अवलंबाने व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधणे शक्य होणार आहे.


शिक्षण क्षेत्रात आज प्रामुख्याने काही नवविचर, नवप्रवाह पाहण्यास मिळतात. जसे की, आंतरवैयक्तिक अध्ययन, वैयक्तिक अध्ययन, आभासी अध्ययन, सहकार्यात्मक अध्ययन सहयोगी अध्ययन इ. होय. शिक्षक केंद्रीत पद्धतीचां प्रभाव कमी होणे ही काळाची गरज आहे.




**अध्ययन - अध्यापनातील नवप्रवाह - संकल्पना -**

अध्ययन - अध्यापनात कृती / कार्य महत्त्वाच्या भूमिका बजावतात. प्रत्येक कृती समर्पक असेल तर ती जास्त परिणमकारक ठरते. यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करुन अध्यापन आजच्या काळाची गरज ठरली आहे. According to Kavlspm. "Teaching is always an act of interpretation." आताच्या शिक्षणपद्धतीत उद्दिष्टसाध्यतेसाठी अमुलाग्र बदल होत असतांना दिसून येतो. नवनवीन विचारप्रवाहांमुळे अध्ययन - अध्यापन कार्य समृद्ध होत आहे.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "




**अध्ययन - अध्यापनातील नवप्रवाहांचे शैक्षणिक महत्त्व -**

1. ज्ञान आणि कौशल्याचे प्रभावीपणे संक्रमण होते.
2. विविध कल्पनांचा वापर करुन अध्ययन घडून येते.
3. विदयार्थ्यांच्या अध्ययनासाठी विविध उपक्रम सुचविता येतात.
4. संघभावना, सहकार्यभावना वाढीस लागते.
5. विदयार्थ्यांना केलेल्या कामाचा खरेपणा समजतो.
6. समायोजनक्षमता विकसित होते.
7. उत्तमोत्तम शिक्षकांच्या अध्यापनाचा लाभ सांघिक अध्यापनामुळे शक्य होतो.
8. सहकार्यात्मक वातावरणात उपलब्ध शैक्षणिक साधनसामग्रीचा कमाल उपयोग करुन घेता येतो.

9. तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षणपद्धतीचा विचार विकसित झाला.
10. ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार अभिरुचीनुसार शिक्षणप्रक्रिया चालते आणि इच्छित ध्येयापर्यंत विदयार्थ्यांना घेता येते.

**समारोप :-**

अध्यापन प्रक्रियेतील एक अविभाज्य घटक म्हणजे शिक्षक होय. शिक्षक शिक्षणाकडे कोणत्या दृष्टीने बघतो यावर शिक्षणाची मदार अवलंबून आहे. 'बालक' केंद्रित या शिक्षण प्रक्रियेत अध्यापक स्वइच्छेने किंवा अनिच्छेने प्रवेश करतो; शिक्षकी पेशा स्वीकारल्यानंतर मात्र तो घेणारी भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. अननुभवी अध्ययनार्थींच्या वर्तनात अपेक्षित व चांगल्या दिशेने होणारा बदल अनुभवी शिक्षकाने घडवून आणायचा असतो. शिक्षणातील नवे प्रवाहांकडे तो कसे बघतो? त्यांचा अध्यापनात किती व कसा अवलंब करतो हे सर्वस्वी शिक्षकाच्या दृष्टीकोनावर अवलंबून आहे.

**संदर्भ - सूची -**

1) कुंडले, म.बा. (1990) : *अध्यापना शास्त्र आणि पद्धती;* पुणेः व्हीनस प्रकाशन
2) नागमोती, पंकज व देसले, सुनिल (2014): *प्रगत अध्यापनाशास्त्र*, नाशिक : सात्विक प्रकाशन.
3) पारसनीस, न.रा. (1994): *शिक्षकांचे प्रशिक्षण;* पुणः नूतन प्रकाशन
4) पवार, ना.ग.(2004): *उदयोन्मुख भरतीय समाजातील शिक्षण*, पुणे : नूतन प्रकाशन